# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २७/११/२०२० (शुक्रवार)

---

## अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग (बलात्कार)

१) पोलीस ठाणे वेलतूर :- अंतर्गत दिनांक २६/११/२०२० चे १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान ०५ किमी. अंतरावरील मौजा वेलतूर येथिल फिर्यादी महिला ही तिच्या ०७ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत घरी हजर असतांना दादाराव गोवर्धन बन्सोड, वय ४० वर्षे, रा. वेलतूर याने फिर्यादीच्या घरी जावून अल्पवयीन मुलीस दहा रुपये दिले. त्यांनतर अल्पवयीन पिडीत मुलगी ही शौचास बाहेर गेली असता तिच्या मागे जावुन जबरीने अतिप्रसंग केला. पिडीत अल्पवयीन मुलगी ओरडली असता तिला जिवाने मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी फिर्यादी महिला यांची तक्रार आणि वैद्यकीय अहवालावरुन दादाराव गोवर्धन बन्सोड, वय ४० वर्षे, रा. वेलतूर यास अटक करुन त्याचेविरुद्ध पोलीस ठाणे वेलतूर येथे कलम ३७६, ३७६(अ), (ब), ५०६ भादंवि सहकलम ४, ६ पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती सुचिता मंडावले, नेमणुक पोलीस ठाणे कुही या करीत आहेत.

## विनयभंग

१) पोलीस ठाणे कळमेश्वर :- अंतर्गत दिनांक २६/११/२०२० चे २०.३० वा दरम्यान मौजा मोहपा सबस्टेशनजवळ यातील फिर्यादी महिला ही आपले मुलासह जेवणानंतर रोडवर फिरत असता राजु खुशाल महाजन, रा. तेलगाव याने मोटार सायकल क्र. एमएच ४०/एए ६५७६ नी पाठीमागुन येवुन फिर्यादी महिलेस लज्जा निर्माण होईल या इराद्याने कमरेच्याखाली थापड मारुन खाली पाडले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ३५४(ड) भादंवी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री लक्ष्मण रुडे हे करीत आहेत.

## रेती चोरी

१) पोलीस ठाणे खापरखेडा :- अंतर्गत दिनांक २६/११/२०२० चे २१.०० वा. दरम्यान मौजा विणा संगम शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन ट्रक क्र. एमएच ३१/सीक्यु ३२५१ चा चालक नामे नरुउद्दीन शेख हा आपले ट्रकमध्ये अवैधरित्या चार ब्रास रेती किं. १६,०००/- रु. ची चोरी करुन घेवुन जात असतांना मिळून आल्याने त्याचेकडुन रेती व ट्रकसह एकुण किं. ८,१६,०००/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोलीस नाईक नितेश पिंपरोदे यांचे तक्रारीवरुन नरुउद्दीन शेख विरुद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री दिपक रेवतकर हे करीत आहेत

## निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत

१) पोलीस ठाणे उमरेड :— अंतर्गत दिनांक १८/११/२०२० चे १७.४० वा. ते १८.०० वा. दरम्यान मौजा नरसाळा शिवारातील डॉ. पालिया यांचे शेताजवळ रविंद्र प्रभाकर ठाकरे, वय ३३ वर्षे, रा. कळमना हे आपले दुचाकी वाहणाने मौजा कळमनाकडुन उमरेडकडे जात असतांना मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीझेड ९३६७ चा चालक स्वप्नील बाबाराव ठाकरे, वय ३५ वर्षे, रा. कळमना याने आपले दुचाकी वाहण निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवुन रविंद्र ठाकरे यांचे मोटार सायकलला धडक मारुन अपघात केला. अपघातात रविंद्र ठाकरे गंभीर जखमी होवुन मेडिकल कॉलेज, नागपूर येथे दिनांक २४/११/२०२० चे ११.२० वा. उपचारादरम्यान मरण पावले. सदर प्रकरणी नितीन देवरावजी बोंडे, वय ३३ वर्षे, रा. कळमना, ता. उमरेड यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे उमरेड येथे कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. सहकलम १८४ मोवाका अन्वये स्वप्नील बाबाराव ठाकरे, वय ३५ वर्षे, रा. कळमना याचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती शितल खोब्रागडे या करीत आहेत.

## गोवंशीय जनावरांना क्रुरतेची वागणुक

१) पोलीस ठाणे मौदा :— अंतर्गत पोलीस ठाण्यात प्राप्त झालेल्या सुचनेवरुन दिनांक २६/११/२०२० चे १९.३० वा. दरम्यान मौजा वडोदा शिवारातील मुरली ॲग्रो कंपनीच्या मागील कॅनॉलजवळ जावून पाहणी केली असता लहान मोठे काही गोवंशीय जनावरांना कोणत्याही प्रकारची चारा—पाण्याची व्यवस्था न करता उपासमारीने व्याकुळ होतील अशा परिस्थितीत वाजवी कारणाशिवाय दोरीने बांधुन ठेवण्यात आले होते. सदर ठिकाणाहुन लहान मोठे विविध प्रकारचे असे एकुण ३९ गोवंशीय जनावरे किं. ३,२७,१००/— रु. यांची सुटका करुन त्यांच्या सुरक्षिततेसाठी सुकृत गोशाळा, कल्याणकारी संस्था, खैरी पिंपळगाव, ता. लाखनी, जिल्हा भंडारा येथे दाखल करण्यात आले. सदर प्रकरणी शासन तर्फे पोलीस नाईक मनीराम भुरे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे मौदा येथे अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ११(१), ११(१)(एफ), ११(१)(एच),११(१) (आय) प्राण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री जंगवाड हे करीत असुन आरोपींचा शोध सुरु आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

१) पोलीस ठाणे कुही :— अंतर्गत दिनांक २५/११/२०२० चे दोन—तीन दिवस अगोदर मौजा भोरदेव शिवारात यातील मृतक ज्ञानेश्वर पंजाबराव आजबले, वय ५८ वर्षे, रा. पावनगाव, ता. कामठी हे फिर्यादी अनिल प्रभुजी फुकट, वय ३५ वर्षे, रा. भामेवाडा, ता. कुही यांचे फॉर्महाऊसमध्ये विहिरीवर पाणी देण्यासाठी लावलेली मोटार चालु करण्यासाठी गेले असता अचानक तोल जावुन विहिरीत पडल्याने पाण्यात बुडुन मरण पावले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कुही येथे अकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली असुन पोलीस हवालदार कृष्णा घुटके हे तपास करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.